UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९२ • मार्च २०२४ • पुरवणी विशेषांक ०८




प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक ८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)

- शके १९४५ • वर्ष : ९२ • पुरवणी अंक : ८

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे • डॉ. एस. व्ही. पणदे • डॉ. बी. एम. मगदूम

*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No 2394-5990

३५. आदिवासी चळवळी विशेष संदर्भ : महाराष्ट्र

– प्रा. अर्जुन बंडू राठोड ---------- १५८

३६. 'उगवाई' नियतकालीकातील कथांमध्ये आलेला स्त्रियांचा संघर्ष

– प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर ---------- १६३

३७. महाराष्ट्रातील शेतकरी, कामगरांचे जागतिक प्रगतीत योगदान

– प्रा. सचिन पोपट सवने ---------- १६७

३८. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणविषयक विविध योजना

– प्रा.डॉ.संजीव सुखलाल बोडखे ---------- १७२

३९. पंडिता रमाबाईंच्या जडणघडणीतील अनंतशास्त्री डोंगरे यांचे योगदान

– प्रा. डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले---------- १७६

४०. पेशवेकालीन विवाहविषयक कागदपत्रे – सबाल्टर्न (वंचित) इतिहासलेखनाचे महत्त्वाचे दस्तऐवज

– डॉ. रामचंद्र वसंत कुंभार ---------- १८०

४१. गांधीवादी आदिवासी नेत्या राजमोहिनी देवी

– डॉ. सुरेश वसंत शिखरे ---------- १८४

४२. प्रचितगडाचा इतिहास

– १) डॉ. सोनावाले राजेंद्र रघुनाथ, २) प्रा. कुंभार भाग्यश्री शामराव ---------- १८७

४३. किल्ले प्रतापगड : इतिहास व ऐतिहासिक वास्तू

– प्रा. डॉ. विश्वनाथ पवार ---------- १९०

४४. वंचित इतिहासाच्या परिप्रेक्षातून दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीत योगदान

– १) डॉ. हाजी नदाफ २) डॉ.रणजीत माने ---------- १९४

४५. इतिहासलेखन प्रवाहातील योगदान सबाल्टर्न स्टडीजचे

– १) प्रा. डॉ. बाळासाहेब नानासाहेब देवकाते २) मानसी विलास भोसले ---------- १९९

४६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सायमन कमिशन

– प्रा. डॉ. बाळासो निवृत्ती कर्पे ---------- २०३

४७. स्वातंत्र्यसैनिक शिवलाल त्रिलोकचंद पोरवाल : अज्ञात भारतीय स्वातंत्र्यसैनिकाचा शोध

– प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश ---------- २०६

ISSN No. 2394-5990

# प्रचितगडाचा इतिहास

१) डॉ. सोनावाले राजेंद्र रघुनाथ
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)
ता. पलूस, जि. सांगली- ४१६३०८
rajendrasonawale26@gmail.com

२) प्रा. कुंभार भाग्यश्री शामराव
सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे
(पी. एचडी संशोधक विद्यार्थी)
मो. ७७५६९९६२५२

**प्रस्तावना :**

शत्रूच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे म्हणून बांधलेल्या वास्तूचा इंग्रजीत फोर्ट (Fort), कॅसल (Castle), सिटॅडल (Citadal), बर्ग (Burgh), इ. संज्ञांनी उल्लेख होतो. तर मराठीत दुर्ग, गिरीदुर्ग, किल्ला, द्वीपदुर्ग, जंजिरा, गढी, कोट, बालेकिल्ला इ. संज्ञांनी या वास्तूचे निरनिराळे प्रकार दर्शविले जातात. 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग, गड कोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजेसैन्याचे मूळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपले प्राण संरक्षण' असे राजाराम-ताराराणीचा हुकूमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य आपल्या आज्ञापत्रात म्हणतो. Fort या इंग्रजी शब्दाचा उगम फ्रेंच शब्द Fortis या शब्दामध्ये आहे. त्याचा अर्थ सामर्थ्य असा आहे. संस्कृतमध्ये त्याला दुर्ग असे म्हणतात. त्याचा उगम दुर्गमान शब्दामध्ये असून त्याचा अर्थ जिंकण्यास दुर्गम असा आहे. किल्ल्याचे बांधकाम आणि उपयोग फार प्राचीन काळापासून सर्व जगभर होत आलेले आहेत. सिंधू संस्कृतीमध्ये हडप्पा शहराला तटबंदी व बालेकिल्ला असल्याचे दिसून येते. ऋगवेदामध्ये 'पूर' या शब्दाने किल्ल्यांचा उल्लेख केलेला आहे. प्रसिद्ध राजनीतिज्ञ विष्णूगुप्त ऊर्फ आर्य चाणक्य यांच्या अर्थशास्त्रामध्ये राज्याची सप्तअंगे सांगितलेली आहेत. त्यामध्ये दुर्ग हे एक महत्त्वाचे अंग आहे. अर्थशास्त्रामध्ये 'औदक' म्हणजे 'जंजिरा', पार्वत म्हणजे डोंगरी, 'धान्वत' म्हणजे 'भुईकोट' आणि 'वनदुर्ग' असे चार प्रकार सांगितलेले आहेत. अर्थातच हे प्रकार सर्वच कालखंडात ठरावीकच होते असे नव्हे तर गरजेप्रमाणे यामध्ये संख्यात्मक बदल होत गेले. सोमेश्वरदेव याने 'अभिलाषितार्थ चिंतामणी' या ग्रंथात किल्लाचे नऊ प्रकार सांगितलेले आहेत. या ग्रंथानंतर नाव घेण्यासारखा दुसरा ग्रंथ म्हणजे बसवराजने लिहिलेला 'शिवतत्त्वरत्नाकर' हा होय. या ग्रंथात किल्ल्यांचे आठ प्रकार सांगितलेले आहेत. प्रचितगड हा यापैकी एक डोंगरी म्हणजेच गिरिदुर्ग आहे. त्याचा भौगोलिक व ऐतिहासिक अभ्यास महत्त्वाचा ठरते.[१]

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. प्रचितगड किल्ल्याची भौगोलिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
२. प्रचितगड किल्ल्याचा एक ऐतिहासिक वास्तू म्हणून अभ्यास करणे.
३. प्रचितगड किल्ल्याचे पर्यटनातील महत्त्व अभ्यासणे.
४. किल्ल्याच्या सद्यस्थिती विषयी माहिती घेणे किंवा अभ्यासणे.

**माहिती संकलन व पद्धती :**

प्रचितगड या किल्ल्याविषयी आवश्यक असणारी माहिती ही प्रकाशित साधने व किल्ल्याला प्रत्यक्ष भेट दिलेल्या व्यक्तींची मुलाखत घेऊन संकलित केलेली आहे. प्रकाशित साधनांमध्ये संदर्भग्रंथ, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (सांगली जिल्हा), संकेत स्थळ इ. चा उपयोग केला आहे.

**प्रचितगड भौगोलिक पार्श्वभूमी**

सह्याद्रिच्या रांगेतील अन्य डोंगरी किल्ल्यांच्या तुलनेने 'प्रचितगड' तसा छोटासाच. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील प्रचितगड हा किल्ला आहे. हा किल्ला उचितगड किंवा राग्वा या नावांनीसुद्धा ओळखला जातो.तो शृंगारपुर या गावाजवळ ५४० मी. उंचीवर आहे. तर समुद्रसपाटीपासून ३००० फूट उंचीवर आहे. किल्ल्याकडे येणाऱ्या दोन्ही वाटा सह्याद्रीची मुख्य रांग व किल्ला यांमधील खिंडीत एकत्र येतात. या खिंडीतून शास्त्री आणि सोनवी नद्या वाहतात. एका टोकाला घनदाट अरण्य आणि दुसऱ्या टोकाला खोल दऱ्या, त्यातून वाहणारे भन्नाट वारे यामुळे तो गड दुर्गम बनला आहे. भयचकित करणारी दरी पाठीशी घेऊनच प्रचितगडाची छोटीशी, पण अतिशय कठीण अशी चढण चढावी लागते. गड चढायला

कठीण, तसाच तो जिंकायला तर फारच कठीण याची प्रचिती शत्रूला तावडतोब येत असावी. त्यावरूनच त्या गडाला प्रचितगड असे नाव मिळाले असावे, असा एक अंदाज आहे. अर्थात, किल्ल्यावर जाताना लागणारे घनदाट जंगल, ७० ते ८० अंशात चढणारी दमछाक करणारी घसरडी पाऊलवाट, अडचणीच्या जागी लावलेल्या डगमगणार्‍या शिड्या किल्ल्याची दुर्गमता अधोरेखित करतात.'

**प्रचितगडाचा इतिहास :**

प्रचितगडच्या इतिहासाविषयी बोलायचे तर पाच पातशाह्यानी पुर्ण महाराष्ट्र आपसात वाटुन घेतला असला तरी या अंधारात काही संस्थाने पणतीसारखी स्वतःचे अस्तित्व राखुन होती. शृंगारपुरचे सुर्वे त्यापैकी एक. प्रचितगडाच्या भरोश्यावरच ते असे वेगळे अस्तित्व राखु शकले. मलिक उत्तेजारने हि छोटी संस्थाने बुडविण्यासाठी आक्रमण केले तेव्हा याच सुर्वे व विशाळगडकर मोरे यांनी त्याचा पाडाव केला. आदिलशहाचे शृंगारपुरचे सरदार सुर्वेच्या ताब्यात १६६१ साली मंडणगड, पालगड हे किल्ले होते. उंबरखिंडीत कारतलबखानाचा पराभव केल्यावर शिवाजी महाराज दाभोळकडे निघाले. वाटेत मंडणगड किल्ला होता. शिवाजी महाराज येत आहेत हे समजताच सुर्वेची तारांबळ उडाली व मंडणगड सोडून आपली जहागिरी असलेल्या शृंगारपूरला पळून गेला. महाराजांनी श्रृंगारपुरवर हल्ला केला. त्यावेळी पिलाजी शिर्के यांची योग्यता पाहून महाराजांनी त्यांना स्वराज्यात सामिल करुन घेतले. २९ एप्रिल १६६० ला शिवाजी महाराजांनी शृंगारपुर ताब्यात घेतले. त्यावेळी तानाजी मालुसरे यांनी शृंगारपुरच्या बाजुने चाल करुन प्रचितगड ताब्यात घेतला. येथे महाराजांना गुप्तधनाचे हंडे सापडल्याचे सांगितले जाते. कोकणातल्या घाटवाटा सारख्या खराब व्हायच्या म्हणून तानाजीला महाराजांनी घाटवाटा दुरुस्त करण्यासाठी याच परिसरात तैनात केले. पुढे पिलाजीची मुलगी जिऊबाई उर्फ़ राजसबाई (येसुबाई) यांच्यांशी संभाजी महाराजांचा विवाह झाला. तसेच शिवाजी महाराजांची मुलगी राजकुंवरबाई हिचा विवाह पिलाजींचा मुलगा गणोजी यांच्याशी झाला. शिवाजी महाराज दक्षिण दिग्विजयाला निघाले तेंव्हा त्यांनी संभाजी महाराजांची शृंगारपूरचा सभेदार म्हणुन नेमणुक केली. शृंगारपूरच्या निसर्गरम्य वातावरणात संभाजी महाराजांमधील लेखक, कवी जागा झाला. त्यांनी बुधभूषणम हा संस्कृत ग्रंथ लिहिला. नायिकाभेद, नखशिक, सातसतक हे ब्रज भाषेतील तीन ग्रंथ लिहिले.' थेट उल्लेख नसला तरी या काळात संभाजी राजे प्रचितगडावर नक्की येउन गेले असणार. पुढे मात्र या गडाने एक करुण प्रसंग पाहिला. मुकर्रबखानाने संगमेश्वराला संभाजी राजांना पकडून शक्य तितक्या त्वरेने घाटावर न्यायचे ठरविले. मात्र प्रचितगड तर मराठ्यांच्या ताब्यात, त्यामुळे शेजारच्या मळे घाटाने संभाजी राजांना कराड-वडूज मार्गे पेडगावला नेले. पुढे इंग्रजांचा सह्याद्रीवर वरवंटा फिरेपर्यंत प्रचितगड मराठ्यांकडे राहिला. अखेरीस १० जुन १८१८ ला कनिंगहॅम याने प्रचितगडाचा ताबा चतुरसिंह यांच्या कडून मिळविला.

**प्रचितगड किल्ल्याचे वर्णन**

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील शृंगारपुर या गावाजवळ ५४० मी. उंचीवर हा किल्ला आहे. किल्ल्याकडे येणाऱ्या दोन्ही वाटा सह्याद्रीची मुख्य रांग व किल्ला यांमधील खिंडीत एकत्र येतात. खिंडीतून पुढे एका शिडीवरून किल्ल्यावर पोहोचता येते. पुढे कातळात खोदलेल्या १० ते १२ पायऱ्या चढल्यानंतर दरवाजाचे अवशेष दिसतात. दरवाजाची कमान अस्तित्वात नसली तरी कमान ज्या खांबांवर उभी होती ते खांब आहेत. दरवाजा उत्तराभिमुख असून दरवाजावर शिल्पकाम होते की नाही हे समजून येत नाही. दरवाजाच्या आतील बाजूस सैनिकांसाठी देवड्या नाहीत. किल्ल्यात थोड्याच अंतरावर मंदिर व बांधीव तलाव आहे. यात बारमाही पाणी नसते.प्रचितगड किल्ला दक्षिणोत्तर पसरलेला आहे. दक्षिण टोकाकडे भवानी देवीचे घुमटी सदृश्य मंदिर आहे. मंदिरात मुख्य दोन मूर्ती दिसतात. एक मूर्ती अंदाजे ३ फूट उंच असून ती भैरवाची असावी, तर दुसरी मूर्ती २.५ फूट उंच असून ती देवीची आहे. या मूर्तींच्या हातात ढाल, तलवार व डोक्यावर मुकुट आहे. वस्त्र व अलंकार परिधान केलेली ही मूर्ती सुबक आहे. जेव्हा किल्ल्यावर राबता होता, तेव्हा मंदिर मोठे असावे. सध्या मंदिराची घुमटी, गाभाऱ्याची जागा व सभामंडपाचे प्रशस्त जोते दिसून येते. या जोत्यावर चार तोफा ठेवलेल्या दिसतात. तोफा अंदाजे साडेचार ते पाच फूट लांबीच्या आहेत. या तोफांना चुना लावलेला आहेत्यामुळे तोफा पांढर्‍या रंगाच्या दिसतात. मंदिरातील भवानी देवीच्या घुमटासमोर म्हणजेच अंदाजे १५ ते २० फूट अंतरावर एक दीपमाळ असून त्याच्याजवळच एका देवीची छोटी मूर्ती आहे. मंदिरातील भवानी देवीमंदिराचा घुमट हा गडाचा सर्वोच्च माथाआहे. मंदिरापासून पूर्वेकडे ३० फूट खाली थोडी सपाटभाग आहे. येथे कातळात लेण्यासारखी खोदलेली पाण्याची टाकी असून त्याला खांब आहेत. खडकात खोदलेल्या एकूण पाच टाक्या या भागात दिसतात. याटाक्या आतून एकमेकांना जोडलेल्या आहेत. सर्व टाक्या पूर्वेकडे तोंड करून गडाच्या माथ्याच्या पोटात आहेत. टाक्याबाहेरील सपाट जागा ही गडावरील सध्याची

 ISSN No. 2394-5990

मुक्कामाची जागा होय. गडाच्या दक्षिणेकडील भागात एक कोठार आहे. कोठाराचे छप्पर शिल्लक नसले, तरी भिंती सुस्थितीत आहेत. कोठाराच्या सदृश्य बांधकामात दिवा लावण्यासाठी छोटा कोनाडा केलेला दिसतो. कोठाराशेजारून वाट गडाच्या दक्षिणेकडील शेवटच्या टोकावर जाते. कोठाराच्या भागापुढील आणि भवानी मंदिराजवळ बांधकामाची काही जोती दिसून येतात. गड सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून थोडा वेगळा असलेला दिसतो. गडाला एकूण १८ बुरूज असल्याचा उल्लेख असून प्रत्यक्षात आज गडाचे १२ बुरूज अस्तित्वात आहेत. गडावर पडणाऱ्या प्रचंड पावसामुळे गडावरील अवशेष हे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.[४]

**प्रचितगड किल्ल्याची सद्यस्थिती :**

कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी आणि सातारा अशा चार जिल्ह्यांच्या हद्दीवर असलेला आणि दुर्गम भागात असूनही इतिहासाची सक्ष देणारा प्रचितगड इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहे. भूकंपामुळे गडाच्या चारही बाजूची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली आहे. चांदोली अभयारण्य पर्यटकांसाठी खुले झाले असले तरी हा महत्त्वाचा किल्ला पर्यटकांना पाहण्यासाठी कोणतीही सुविधा नाही. काही हौशी पर्यटक ट्रेकिंग करत जात होते. मात्र, त्यांच्यावरही वन विभागाने बंधने आणली आहेत. गडावर भवानीदेवीचे पडझड झालेले भग्नावस्थेतील मंदिर आहे. गडाच्या दक्षिणेचा काही भाग भूकंपाने तुटून गेला आहे. सध्याही सतत होणारे भूकंप, तीन महिने पडणारा संततधार पाऊस यामुळे गडावरील अनेक इतिहासकालीन वस्तू नामशेष होत आहेत. गडाचीही अवस्था इतिहासजमा होण्यासारखी आहे. गडावरील महाल, धान्यांची कोठारे नामशेष झाली आहेत.[५]

**निष्कर्ष :**

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आणि हिंदवी स्वराज्यातील अनेक शूरवीरांच्या पराक्रमांची साक्ष देणारा प्रचितगड हा किल्ला दुर्गमतेमुळे काहीसा उपेक्षित राहून त्याची पडझड झाली आहे. परिणामी, या किल्ल्याच्या संवर्धनासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

**संदर्भ :**

१. गोगटे, चिं. ग. महाराष्ट्र देशातील किल्ले भाग -२, पुणे, १९०५
२. जोशी, सचिन विद्याधर, रत्नागिरी जिल्ह्याचे दुर्ग वैभव, पुणे, २०१३
३. www.trekshitiz.com
४. सहस्रबुद्धे चिंतामणी- इतिहासाची सुवर्णपाने पान नं. ३३-३६
५. अक्कलकोटसतिश-शोध शिवछत्रपतींच्या किल्ल्यांचा

■■■